।। हरि ॐ।।

।।ॐ नमो भगवते श्री विनायकाय नमः।।

# ।। श्री समर्थ सद्‌गुरु संत विनायकभाऊ महाराज स्तोत्र ।।



Scanned with CamScanner




Scanned with CamScanner

|| जय श्रीराम ||

|| जय हनुमान ||

|| हरि ॐ ||

|| ॐ नमो भगवते श्री विनायकाय नमः ||

# || श्री समर्थ सद्‌गुरु संत विनायकभाऊ महाराज स्तोत्र ||

ॲड. श्रीकृष्ण रामकृष्ण राहाटे, शेगांव रचित...

|| श्री गणेशाय नमः ||

|| माता तुळजा भवानी नमः|| राम कृष्ण हरी ||

|| जय ज्ञानेश्वर माऊली । जय तुकाराम महाराज ||

|| जय श्री स्वामी समर्थ । जय गजानन माऊली ||

|| जय सखाराम बाबा । जय श्रीराम बाबा ||

|| जय नाथ बाबा । जय वासुदेव महाराज ||

|| श्री संत सद्‌गुरु विनायकाय नमः ||

Scanned with CamScanner

|| श्री गणेशाय नमः ||

सकल संत चरित्रसार । दाविती मानव कल्याण ।
धर्मजागृती प्रेरणेने । उत्कर्ष करावा मनोमनी ||१||
सद्गुरु स्तोत्र कारण । चरित्र स्तुती मंथन ।
अद्भुत लिला प्रकटती । संत सद्गुरु सत्संगे ||२||
संत महिमा लिखाणाला । स्तुती स्तोत्र मनोरथाला ।
कृपा विनायकभाऊंची । संत चरित्र लेखनास ||३||
मज हस्ते लेखन । संतस्तुती सुमनं । संतसेवा करवून । देती दृष्टांत मजला ||४||
संत विनायकभाऊंचा । स्तोत्र परिपाठ साचा ।
करुनी चिंतन मनन । श्रवणं करावे एक चित्तं ||५||
संग्रामपुर तालुक्यात । बुलढाणा जिल्ह्यात ।
ग्राम उकळगांवी । भिसे परिवार राहतसे ||६||
सहा जुन ऐकोणवीसशे शेचाळीस । आई देवकाबाई बाबा शंकरराव ।
भिसे कुळी उकळगांवात । संत विनायक प्रकटले ||७||



Scanned with CamScanner

शंकरराव पाटील । असती मनीचे श्रीमंत ।
भरघोस शेती पिकवूनी । चरितार्थ चालतसे ।।८।।

पांच बंधुंचे ऐक्य । हरि , गुलाब, रमेश, माणिक ।
कष्ट करण्या सत्वर । असती सोबतीला ।।९।।

बालपणी भक्तिची आंस । हनुमंताचा ह्दयी निवास ।
मुखी जयश्रीराम नाम । अखंड नामजप चालतसे ।।१०।।

शेतीकाम करुनी । उसंती वृक्षाखाली बसूनी ।
हरिनाम संकिर्तन करोनी । दैनदिनी अविरत ।।११।।

बालपणी आजोळी । हनुमंताच्या साधनेवरी ।
ब्रम्हमुहुर्ती उठोनी । भाऊ करती पुजा अर्चना ।।१२।।

हा नित्यक्रम भाऊंचा । अखंड ध्यास हनुमंताचा ।
एकाग्रचित्ती साधना । हनुमंतकृपा होतसे ।।१३।।



Scanned with CamScanner

करिती मामा पाठलाग । पहाटे एकदिवस ।
विनायक करतो काय । म्हणुनी बैसले लपुन ।।१४।।
नदीवर पहाटे जाऊनी । ब्रम्हमुहुर्ती स्नान करुनी ।
खडकाचा चुना घेवुनी । लावती टिळा हनुमंताला ।।१५।।
मामा झाले अवाक । विनायक विभुती थोर ।
आजवर न ओळखिले । आम्ही विनायकाला ।।१६।।
कौतुक करुनी सांगती । महती विनायकाची ।
तोवर सगेसोयरे । भेटती हर्षोउल्हासे ।।१७।।
स्वयंसिध्द साधना । हनुमंतकृपे कामना ।
फलित होई शब्दब्रम्ह । भाऊ विनायक जे बोलती ।।१८।।
जसजसा वेळ जाई । लोकांचे काम होई ।
गर्दी होवु लागली । विनायकभाऊंना भेटण्या ।।१९।।

खऱ्या संताची लक्षणे । विलक्षण असती रक्षणे ।
कृपाछत्रे गुरुंच्या । समानता ही अंगी ॥२०॥
लिला पाहुनी भाऊंच्या । लोक होती अवाकं ।
चित्तअंतःकरणी नामजप । निरंतर चालतसे ॥२१॥
एकच ध्यास मनी । भक्तीभाव वसवावा मनी ।
आपुला हा जन्म । जनोध्दारं करावया ॥२२॥
अखंड अनंताचा मनोजप । गुरुदिक्षेचा अविरतं ।
प्रगाढ विश्वास दृढनिश्चयं । एकसाक्षी हनुमानं ॥२३॥
सगुणं दर्शन हनुमंताचे । दृष्टीत लोपीले ।
जनसेवा व्रताने । निर्मीले अनेकानेक मंदिर ॥२४॥
मंदिरे झाली बांधून । जनी हरिमार्गी लावून ।
मोक्षप्रद कर्म करवून । कृपा केली भाऊंनी ॥२५॥

विनायकभाऊंचे सद्गुरु । मेहुणकर श्रीराम महाराज ।
नाथबाबा, संत वासुदेव । ऐसे भाऊ वदती ॥२६॥

मुक्ताबाईच्या वारीत । श्रीराम महाराजांसवे ।
मुखी अखंड हरिनाम । गोडवा अवर्णनीय सांगती ॥२७॥

नाथ बाबांच्या आश्रमी । जाती भाऊ वरचेवरी ।
भांडी घासून स्वच्छ करी । जसा देह अंतर्मन ॥२८॥

असा बोध नाथ बाबा । करती भक्ताप्रंती ।
विनायकभाऊंची प्रत्यक्ष कृती । तरीच साधे साधना ॥२९॥

जो साधनामार्गी लागला । गुरुसेवेने साधीला ।
मुक्तिप्राप्ती याच जन्मी । गुरुचरणी होतसे ॥३०॥

संत वासुदेव अकोटवासी । भगवी पताका फडकविती ।
वारकरी सपंद्रायासाठी । अपुले आयुष्य वेचले ॥३१॥

अखंड जीवन सेवाव्रत । वैराग्य ज्ञान प्रज्ञावंत ।
भागवतधर्म वाढवूनी । पांडूरंग चरणी विसावले ।।३२।।
दोनाचे चार हात करावे । विनायकाचे लग्नं करावे ।
असा धरिला अट्टाहास । वडिल शंकररावांनी ।।३३।।
विनायकभाऊ हतबल । वडिलांपूढे नतमस्तक ।
आग्रह तो वडिलांचा । सरते शेवटी स्विकारला ।।३४।।
मांजरीचे पारस्कर । यांची लेक लाडकी विमल ।
विनायक भाऊंचा विवाह । थाटात पार पडतसे ।।३५।।
गृहलक्ष्मी येता घरी । विनायकभाऊ बोलती ।
माझा जन्म ब्रम्हचारी । हा अखंड राहील ।।३६।।
विमलामाईंचा गहिवर । झाले अश्रु अनावर ।
जे आमुचे कर्मबंध । साहवू जन्मभरी ।।३७।।



Scanned with CamScanner

आयुष्यभर माहेरी । विमलामाई धर्मसाधना करी ।
अखंड सौभाग्य लेवुनी । हरिचरणी विसावल्या ।।३८।।
वडिलांचे वचन । सौभाग्यवतीस वचन ।
विमलामाईंचे वचन । सार्थ झाला परमार्थ ।।३९।।
विनायकभाऊंचे रुप । अनेकांत एक ।
विविधरंगी संसार । एकरुप केला ।।४०।।
मौन असता एकांती । हितगुज ते ब्रम्हांशी ।
अनाकलनीय देहकृती । आम्हा दृष्टी पडतसे ।।४१।।
दुर्धर रोगांचा नायनाट । करिती विनायकभाऊ सत्वरं ।
निवारण केले भक्तांचे । भाकरीच्या प्रसादाने ।।४२।।
हताश हतबल रोगी । नसे उरली आशा जगी ।
अशा कठीण समयी । भाऊंनी दिले जीवनदान ।।४३।।



Scanned with CamScanner

दिव्यत्वाची जाण । संकल्प महान ।
एकच दाता । संत विनायक ।।४४।।

विश्वरुपी एक । चैतन्ययोगी कल्पतरु ।
सद्गुरु सत्‌रुपे । उकळगांवी लिलाधरं ।।४५।।

आम्हा लेकुरासी । पाझरिला पान्हा ।
हिताहेतु कान्हा । संत विनायक ।।४६।।

पदराशी घ्यावे । इतुकी ही माया ।
मायलेकरु सम । जुळती ॠणानुबंध ।।४७।।

प्रश्न सुटती येथे । अगाध अनंत ।
दुःखी कष्टी लोकं । सुखी होतं ।।४८।।

केवळ स्पर्शाने । रोग होती बरे ।
वैद्यही अवाक । क्षणभरी ।।४९।।

विश्वकणी सर्व । व्यापक रुपे । अनंत ब्रम्हांड । जगत दाता ।।५०।।

उकळगांवी प्रकटले । सत्य अगाध । प्रकाश जाहला । लिलारुपी ।।५१।।

काये ते गोडवे । गावे किती आम्ही । प्रत्यक्ष अनुभव । भक्त घेती ।।५२।।

प्रलयची प्रलय । थोपविली लिला । ऐशी प्रचिती । भक्तां येते ।।५३।।

आम्हा नाही जाण । आपुल्या करुणेची ।
आजही निश्चिंत । भाऊंच्या कृपेवरी ।।५४।।

विनायक नाम । सत्य चैतन्य । ह्दयी वसवावे । मननचिंतन ।।५५।।

आपुले ते गांव । संताची वसती ।
पांडूरंग चित्ती । एक ध्यास ।।५६।।

भक्ता देती बळं । कठिण समयी ।
एका एक लिला । प्रगट होई ।।५७।।

सुख दुःखाचा व्यापार । कलियुगे सांडीला ।
चित्ती नामाने । हरि व्यापिला ।।५८।।

संताचिया वचने । चाली रितीभाती । अखंड परंपरा । याच भुमिवरी ।।५९।।

नामजपता निरंतर । पांडूरंग भेटी अनावर ।

मनी दाटिले निरंजन । नामप्रकाशाचे ।।६०।।

आपुल्याच हाती । जीवनाचा सार । दाटूनिया पूर । अपुल्या मायेचा ।।६१।।

आम्हा नाही काही । जाण या जगाची ।

शिकवावे ज्ञान । याजन्मी मुक्तीसाठी ।।६२।।

कित्येक प्रहार । होई दगडापरी ।

घडती शिल्पं । संस्कार प्रभावे ।।६३।।

ऐसेची आम्हां । घडवावे भाऊ ।

हाच आशिर्वाद । असू द्यावा ।।६४।।

आम्हा घडवावी । मुक्तीची ही वारी ।

कृपा दृष्टी आपुली । सदा निरंतर ।।६५।।
हास्य वदनाने । जीवन अंतरंगी ।
कायापालट होई । भक्तांच्या अंतरी ।।६६।।
आपुल्या कृपेवरी । सुख भोगती दिगंत ।
आम्हा भगवंत । सद्गुरु संत विनायक ।।६७।।
वैराग्याची प्रभा । क्षितिजी ललाटली ।
दिव्य शक्ती लिला । भाऊ रुपे प्रगटली ।।६८।।
जनांच्या उध्दारी । संतांचा संचार ।
घ्यावा हा प्रसाद । या नश्वर जन्मी ।।६९।।
धर्माच्या पताका । लावूनी मंदिरी ।
कथा संकिर्तने । घडती अविरत ।।७०।।
भाऊंचा हा वसा धर्मजागृतीचा । अखंड सेवादिप तेवत असे ।
भाऊंच्या प्रसादे कृपावंत भक्त । प्राप्त भव्यदिव्य होती कित्येक ।।७१।।

असाध्य ते रोग नष्टची समूळ । दृष्टीपथे येई भाऊंलिला ।
भक्तांच्या अश्रृंची असे जाण भाऊ । फुले करावया क्षणाधार्थ ।। ७२।।
विनायक नाम असे भक्त मुखी । भाऊ ही विभूती सद्गुरु माऊली ।
उकळगावी असे संतांचा मेळा । भाऊंची मुर्ती चैतन्य चैतन्य ।।७३।।
जय श्रीराम जयघोष । भाऊ करती अविरत ।
नामनिनाद वलय । भक्त ह्दयी विसावती ।।७४।।
अष्टमहासिध्दीचा झळाळे प्रताप । कायावाचामनी दिव्य ब्रम्हं।
कृपा दृष्टी आशीर्वाद । होई निवारण कष्ट दुःखं ।।७५।।
अखंड हरिनाम । वदावे मुखी ।
मानव जन्मी भक्ती । नामसंकिर्तने मिळे मुक्ती ।।७६।।
संत्यसंकल्प मनोमनी । भगवंत चरणी अर्पावा ।
आपुला संसार सुखी करोनी । परमार्थ साधावा ।। ७७।।



Scanned with CamScanner

विश्व ही मोहमाया । अंतरी एक नाम ।
सदा मनी जपंमाळ । मुक्तीसाठी तुम्हा माझी ही गळं ॥७८॥

कृपा आशिर्वादि भक्तांना गती । संतांची लिला सत्यप्रचिती ।
लिला दृष्टीपथे स्तब्धमती । कृपाआर्शीवाद सदा सोबती ॥७९॥

सद्‌गुरु संत । सर्वदृष्टी एक भाव ।
निवांत वसती । लासुरा हे गांव ॥८०॥

आत्याबाई निवासी । भाऊंचा मुकाम ।
निवास झाले भक्तां । भक्तांची मंदियाळी ॥८१॥

विश्वनाथ ढोले निवासी । पहुडती खाटेवरी ।
चालती परमार्थाच्या । भक्तांसवे गुजगोष्टी ॥८२॥

पदस्पर्शानि पावन । झाले लासुरा गांव ।
याच भुमीवरी । होतसे शांती आश्रम ॥८३॥

लासुरा फाट्यावर । विश्वनाथांचे शेत ।
स्थापुनी शांती आश्रम । स्थिरावले एक स्थळी ॥८४॥
लासुरा ग्रामी । असती तिन संत ।
संत मारुती संत जगदेव संत पांडुरंग ।
चतुर्थ संत विनायक ॥८५॥
संत मारुती महाराज । कायाकल्प करिती ।
मुक्तिची वाट । वारी पंढरीची ॥८६॥
संत जगदेव बाबांच्या हाती । भगव्या पताका ।
मुहूर्तमेढ रोविली । सनातन भागवत धर्माची ॥८७॥
संत पांडुरग । वैराग्याची मुर्ती । किर्ती या संतांची । विश्वभरी ॥८८॥
विनायकभाऊ स्थिरावले या गावी । संत मंदियाळी साधावया ।



Scanned with CamScanner

अश्रुंनी ओथंबली संताची चरणे । पुनीत झालासे शांती आश्रम ।।८९।।

अश्रुंची झाली फुले । भाव मनी दाटला । ऐसा आटापिटा । कळवळा असे ।।९०।।

मनाची सुंदरता । दिसे भक्तांगणी ।
म्हणुनची साकारिले । शांती आश्रम ।।९१।।

यावे घटकाभर शांती आश्रमाला । सोडावी शिदोरी मनोभावे ।
घ्यावे दर्शन पहावे पांडुरंगा । पाहती डोळे पाणावती ।।९२।।

भक्तांना असे प्रचिती । भाऊंच्या कृपा दृष्टीची ।
अनुग्रहीत शिष्यांची । सेवा कारणी लागतसे ।।९३।।

खामगांवच्या अर्चनाताई कोल्हे । करती भक्ती मनोभावे ।
विनायकभाऊंच्या कृपाप्रसादाने । जीवनी उत्कर्ष घडतसे ।।९४।।

जशा मुंडगांवच्या बायजाबाई । पावन कृपेने गजाननाच्या ।
तैशीच सेवा अर्चनाताईंची । सदानकदा घडतसे ।।९५।।



Scanned with CamScanner

एकेदिवशी फुटले कुकर । उष्ण अन्न पडले अंगावर ।
छत झाले छिन्नविछिन्न । उष्ण अन्न थंड लागतसे ।।९६।।

ही लिला विनायकभाऊंची । अर्चनाताईंनी ओळखुनी ।
सद्गुरु कृपेने संकटे । पार होती नाहीशी ।।९७।।

सुभाषराव फोकमारे देवरीचे । घराणे असे भक्त शंकराचे ।
कृपाआशिर्वाद भाऊंचा । असे परिवारावरती ।।९८।।

गौतमभाऊ अकोल्याचे । मौनध्यानी चिंतन ।
ध्यास असे भाऊंचा । सांगती उकल विनायकभाऊ ।।९९।।

शेगावीचे गणेश राहाटे । असती प्राध्यापक पुण्यात ।
येती दर्शना सद्गुरुंच्या । विराट शांती लाभतसे ।।१००।।

संपूर्ण परिवार आजवर । भक्तीत कदापी न अंतर ।
प्रांतःसंध्या एकच नाम । श्री सद्गुरु माऊली ।।१०१।।



Scanned with CamScanner

चिंचोलीचे श्रीकृष्ण ढगे वकील । राहती रोकडिया नगरात ।
भाऊंच्या भेटीतुन । आशिर्वाद लाभतसे ।।१०२।।
एक दिवस सांगीतले । तुमचा बंगला होईल ।
कुतुहल वाटले मनी । ढगे वकील साहेबांच्या ।।१०३।।
कालांतराने सेवेत । झालेसे अविरत । आजही निरंतर । सेवा घडतसे ।।१०४।।
भाऊंच्या आशिर्वादाने । उत्कर्ष घडे चैतन्याने ।
आजही सर्व कामे । भाऊ करवुनी घेतात ।।१०५।।
श्रीकांत शेळके वकील शेगावीचे । येती दर्शना भाऊंच्या ।
मनहर्ष उल्हासे करती सेवा । मनःशांती लाभतसे ।।१०६।।
भाऊंच्या दर्शनाने । मन शांत होई जाणे ।
जशी मनःअस्थिर अवस्था । पुर्णपणे निवळत असे ।।१०७।।
निलेश म्हैसने अकोल्याचे । साळु शेळके वकिलांचे ।
गंभीर असता प्रकृती । होती घटका शेवटची ।।१०८।।

साकडे घातले शेळके वकीलांनी । अर्धांगिनीला आश्रमी पाठवूनी ।
पाहुनी क्षणभरी भाऊंनी । मृत्युगंडातर टाळीले ।। १०९।।
म्हैसने कुटूंब मानती ऋण । येतात सहकुटुंब आश्रमी ।
व्यक्त करीती उपकार । विनायकभाऊंचरणी निःसंशय ।।११०।।
माझा मुलगा अंकुशचा । आजार पोटदुखीचा ।
अनेक वैद्य करुनी । काही केल्या थांबेना ।।१११।।
सखारामपुर उत्सवात । भाऊ बैसलेले नदीपात्रात ।
देऊन वरण भाकरीचा प्रसाद । अंकुशचा आजार बरा केला ।।११२।।
कित्येक रुग्ण किडणीचे । कित्येक दुर्धर आजारांचे ।
विनायकभाऊंच्या आशिर्वादाने । ठणठणीत झाली बरी ।।११३।।

लोकं येती निमित्ताने । कित्येक दुःख व्याधीने ।
कित्येक विविध कारणाने । आपुले हित साधण्याशी ॥११४॥
इथे येणाऱ्या प्रत्येकाचे । हळुहळू साध्य झाले साचे ।
जैसे ज्याचे मनोरथ । पुर्णत्वास नेले भाऊंनी ॥११५॥
हे स्तोत्र पुर्ण करण्याला । अनुभव मागीतले भक्तांना ।
जे झालीया प्राप्त । जसेच्या तसे रेखाटले ॥११६॥
काय सांगु तुम्हा । जन्मा यावे लागे पुन्हा ।
चक्रव्युह मायाजालचे । निश्चये भेदण्याला ॥११७॥
भाऊ किर्तनकारां सांगती । समाजा होई उपरती ।
ऐसाची बोध करावा । समाजमन उन्मुलन्याला ॥११८॥
नका करु सोंग ढोंग । दिसती तसेच असती ।
यानेच वाढेल धर्मसंस्कार । हाची मंत्र जपावा ॥११९॥



Scanned with CamScanner

विठ्ठल नामाची श्रृंखला । धर्मपंथाच्या शिकवणीला ।
संसार करुनी निट नेटका । साधुनी घ्यावा परमार्थ ।।१२०।।
माणसाने संग्रही असु नये । विना कारण साठवु नये ।
ज्याने होईल समाजहित । ऐसा गोपाळकाला करावा ।।१२१।।
संतांच्या संगतीत हित । चित्त करुनिया स्थित ।
जीवन उत्कर्षीत करवुनी । दाही दिशा उजळाव्या ।।१२२।
पावले  सावध उचलोनी । समयसुचकता ठेवोनी ।
संसार परमार्थ साधोनी । मुक्त व्हावे मनातुनी ।।१२३।।
बोध बोधाचे सत्यवचन । वदती भाऊ क्षण न क्षण ।
श्रवण करुन भक्तगण । मंत्रमुग्ध होतसे ।।१२४।।
असे जन्माचे कारण । मुळ पाहीले शोधुन ।
मनमुक्त करवुन । निरंकार असे ।।१२५।।



Scanned with CamScanner

एकांत अन एकटेपण । संधान साधेल आपुले मनं ।
सानिध्य होई भगवंताचे । ऐसा योग आणावा ।।१२६।।
साधना अशी परिपक्व । अपुला एकांत अन भगवंत ।
होई भाव भावनाभावित । प्रभु भक्त हनुमंत ।।१२७।।
जे जे काही साधीले । ते हनुमंतकृपे जाहले ।
मी असे निरंक । हनुमंताच्या कृपेने ।।१२८।।
हनुमंताची प्राणप्रतिष्ठा करोनी । गावोगावी मंदिर बांधोनी ।
धर्म कार्य करवुन घेवोनी । भाऊंनी समाजोध्दार केलासे ।।१२९।।
धर्म उत्सवाकारणे । भक्त येती धावुन ।
भागवत सप्ताह संकीर्तन । आनंदे पार पडतसे ।।१३०।।
स्वानंद लोकवर्गणीतुनी । विश्वासाने एकचित्ती ।
म्हणुनची भगवंतसेवा । लोकसेवे घडतसे ।।१३१।।



Scanned with CamScanner

भेदाभेद अमंगल । सांडोनी जाय सकल ।
रिक्त शुध्द पवित्रमनी । परमार्थ अंकुरतसे ।।१३२।।
ही खुण संतांची । लिला भगवंताची ।
आमुलाग्र उन्मूलन । मनचित्ती घडतसे ।।१३३।।
भक्तांची व्याधी वारुनी । अगाध लिला करोनी ।
प्राणपर्वणी देवुनी । केले तया संकटमुक्त ।।१३४।।
लासुरा फाट्यावरती । केला स्थित शांती आश्रम ।
वारी करण्या भक्तांना । मार्ग होई सुकर ।।१३५।।
याच आश्रमी गुजगोष्टी । होती बोधप्रद वचन ।
कथा किर्तनरुप प्रसाद । भक्तांनी सेवन करावा ।।१३६।।
भाऊंच्या बोलण्याचा सार । जीवन संजीवनी अपार ।
प्रत्येकजण होई परिवर्तीत । ही मोक्षदायी उकल ।।१३७।।



Scanned with CamScanner

मनी धरावा पांडुरंग । रामकृष्ण हरी गजर ।
कंठीप्राणी नामश्वासाची लय । गाठ बांधावी या जन्मी ।।१३८।।
साधे सरळ जीवन । पार करावे गुरु शिकवणीवर ।
गुरुमंत्र ध्यानी मनी । एक ध्यासी जपावा ।।१३९।।
दृष्टी दिसे ते नष्ट असे । सृष्टीचक्राचे हे वसे ।
जपुनी चालावे निरंतर । चिरंतन गुरु ध्यास ।।१४०।।
गुरुमहती सांगती । शास्त्रपुराणे वदती ।
पार पडे ही जीवनवारी । सद्‌गुरुंच्या प्रभावे ।।१४१।।
सद्‌गुरुं मंत्राचा ध्यास । सद्‌गुरुमुर्तीचे पुजन ।
चरणदर्शन घेवुन । जीवन पार करावे ।।१४२।।
लासुरा फाट्यावरील शेतजमीन । येते इरखेड शिवारात ।
वाटीले सद्‌गुरुंना । येथे आश्रम उभारावा ।।१४३।।



Scanned with CamScanner

मनी धरावा पांडुरंग । रामकृष्ण हरी गजर ।
कंठीप्राणी नामश्वासाची लय । गाठ बांधावी या जन्मी ॥१३८॥
साधे सरळ जीवन । पार करावे गुरु शिकवणीवर ।
गुरुमंत्र ध्यानी मनी । एक ध्यासी जपावा ॥१३९॥
दृष्टी दिसे ते नष्ट असे । सृष्टीचक्राचे हे वसे ।
जपुनी चालावे निरंतर । चिरंतन गुरु ध्यास ॥१४०॥
गुरुमहती सांगती । शास्त्रपुराणे वदती ।
पार पडे ही जीवनवारी । सद्‌गुरुंच्या प्रभावे ॥१४१॥
सद्‌गुरुं मंत्राचा ध्यास । सद्‌गुरुमुर्तीचे पुजन ।
चरणदर्शन घेवुन । जीवन पार करावे ॥१४२॥
लासुरा फाट्यावरील शेतजमीन । येते इरखेड शिवारात ।
वाटीले सद्‌गुरुंना । येथे आश्रम उभारावा ॥१४३॥



Scanned with CamScanner

हे शेत विश्वनाथ ढोले पाटीलांचे । इरखेड गट नं.२ चे ।
गुंठे पंधरा खरेदी करुनी । शांती आश्रम निर्मिला ।।१४४।।
भक्तगणांच्या देणगीतुन । भव्य बांधकाम करुन ।
सद्गुरुंच्या निवासासाठी । दोन खोल्या निर्मिल्या ।।१४५।।
भक्तांच्या पै पै देणगीतुन । साकारती आश्रमी नंदनवन ।
सर्व भक्तांच्या सोयीसाठी । येथे आश्रम निर्मिला असे ।।१४६।।
श्री भाऊंच्या आदेशावरुन । शांती आश्रम संस्था नोंदणी करुन ।
विश्वस्तांची नेमणूक । भाऊंनीच इच्छिली असे ।।१४७।।
ढगे वकीलांकडुन घेतले वचन । अध्यक्षपदीय कारभार सांभाळून ।
कर्तव्याशी चुकु नये । गुरु आदेश पाळावा ।।१४८।।
भाऊंच्या आदेशाचे पालन । सेवा शिरोधार्थ मानुन ।
नित्यदिन आश्रमाची । चोख व्यवस्था होतसे ।।१४९।।



Scanned with CamScanner

हजारो भक्तांचे निवारण । होई सद्‌गुरुंच्या हातुन ।
संकटे दुर होती । हिच सत्य प्रचिती ।।१५०।।
भक्त लक्ष्मणराव धोरण । नोकरीला पाटेबंधारे विभागात ।
२००२ सालात । भाऊंना भेटण्या योग आला ।।१५१।।
शांतामाई ढगेंनी सांगीतले । भेटावे एकदा भाऊंना ।
ऐसेची भेट घेवुनी । सांगितले भुतभविष्य ।।१५२।।
तेव्हा पासुनी आजवर । धोरण कुटूंबीयाची श्रध्दा सत्वर ।
निष्ठा हिंच भाऊंवर । आजही अढळ असे ।।१५३।।
मंगेश अन् अपर्णा । असती गंभीर आजारी ।
भाऊंना जाता दूरध्वनी । आजार दूर पळतसे ।।१५४।।
दोनच दिवसात भाऊंनी । बोलाविले दोघांना आश्रमी ।
सद्‌गुरु कृपेनी सर्व विघ्न । आपोआप लोपतात ।।१५५।।



Scanned with CamScanner

रुपालीच्या विवाहप्रसंगी । काळेकुट्ट मेघ आले दाटुनी ।
विनवणी करती भाऊंना । सद्भक्त पांडूरंग मार्के ॥१५६॥
विवाह थाटात पडला पार । भाऊं निर्विघ्न आनंदमय ।
आजुबाजुच्या पंचक्रोशीत । वादळवारा होतसे ॥१५७॥
पर्जन्य देवतेला साकडे । करुनी सद्गुरुमाउलींनी ।
भक्तांचे संकट टाळुनी । पाठीराखा होतसे ॥१५८॥
भक्तांसवे पंढरपूर जाऊनी । एका खोलीत बैसुनी ।
भाऊं सांगती भक्तांना । जा करुन यावे दर्शन ॥१५९॥
बाबाराव पाटील आग्रह धरती । चला भाऊं दर्शन घेऊ ।
भाऊ उठती तत्पर । गर्दीत दर्शन घेतले ॥१६०॥
विठ्ठल मंदिर ब्राम्हणाने । पुजा करवून घेतली ।
भाऊंच्या हस्ते पांडूरंगाची । अनुभव हा महान असे ॥१६१॥



Scanned with CamScanner

दिपक डोंगरे पातोंड्याचे । सदा सेवेत भाऊंच्या ।
भाऊंच्या कृपा आशीर्वादाने । कूपनलिका जलधारांनी पाणावल्या ॥१६२॥
शेतमळा करुनी । धनधान्य पिकवूनी ।
नविन वास्तू संपन्न झाली । कृपा हि विनायकभाऊंची ॥१६३॥
वसंता पाटील बोराळाचे । वेध तयांना भावभक्तीचे ।
भाऊंना स्वगृही नेण्यासाठी। आग्रह सदानकदा असे ॥१६४॥
एकदा चिखलदरा जातानी । नलिनीबाईची प्रकृती बिघडुनी ।
रस्त्याच्या कडेला टेकवुनी । भाऊं मंत्र म्हणताती ॥१६५॥
शरीरातला प्राणवायु । आणीला परतोनी ।
ही लिला पाहीली सर्वांनी । झाले सुरपाटणे वैद्य अवाक ॥१६६॥
चरणजितसिंग पोपली खामगांवचे । तया दुर्धर आजारानी ग्रासले ।
दिवसातुनी वारंवार । येती भाऊंच्या दर्शनाला ॥१६७॥

मनी भिती दाटली । अघटित चिंता वाटली ।
भाऊंनी केले निवारण । चरणजितसिंगच्या आजाराचे ॥१६८॥

श्रावण कृष्ण एकादशी । तीन सप्टेंबर एकविस दिनी ।
पहाटे दोन अठ्ठाविसला । अंतर्धान पावले सद्गुरु ॥ १६९॥

पुर्वीच आश्रमी जाऊन । कालंकामाता स्थळाला भेट देऊन ।
प्राणज्योत प्रज्वलित करुन । ज्योतीत ज्योत मिळतसे ॥१७०॥

मी आहे येथं । तुम्हा सांभाळण्याप्रती सत्य ।
मी गेलो ऐसे मानु नका । भक्तीत अंतर करु नका ॥१७१॥

या उक्तिप्रमाणे । या साक्षीभावाने । शांती आश्रमी दिप । तेवता ठेवावा सदान्कदा ॥१७२॥

निर्विकल्प समाधी जाण । तरी अनंताचे भान ।
चिन्मय संजीवन । ज्योतीत ज्योत एकरुप ॥१७३॥

भाव अन् भक्ती । उदय होई मनीरुपी ।
सद्गुरुंच्या कृपेने । होई जन्म मोक्षदायी ॥१७४॥

भक्तीचे भावरुपं बीजं । अंकुरती निर्लेप ।
सकस कसदार भुमीवरं । जगती महती पावती ॥१७५॥

जे जे असती नानारुपं । एक ब्रम्हंची सकळ ।
उपजती साक्षात्कार । सात्वीक सत्यभावे ॥१७६॥

मनुष्य जन्मे भीतरी । पडली भ्रांतीची अवधी ।
सरते आयुष्य शेवटी । हात ही रिक्त असे ॥१७७॥

म्हणुनची सांगती सत्यवचनं । एक नाम एक क्षण ।
वाया न जायी हा जन्म । नाम वारी अखंड करावी ॥१७८॥

सत्य संतांचे लक्षणं । मनी परिपूर्ण वैराग्य ज्ञान ।
जगामाजी उदासभाव । परि अंतरी सुखाचा सागर ॥१७९॥

ऐसे विनायकभाऊंचे जीवनपटलं । अवतरली भक्तांच्या मनावरं ।
जीवन लिलांचा प्रभाव । नेहमी अवतीर्ण होतसे ॥१८०॥



Scanned with CamScanner

एक एक भक्तानी । सेवा केली असे मनापासुनी ।
प्रशांत सहस्त्रबुध्दे । सेवेला असे तत्पर ।।१८१।।
भाऊंच्या सोबतीला । भागवत ढोले अनेक वेळेला ।
कामे आटोपुनी शेतीची । सेवा करण्या येतसे ।।१८२।।
गजानन वाघ वेळोवेळी । आवडीने सवड मिळे तशी ।
येता आश्रमा धावूनी । भाऊंच्या सेवेसाठी ।।१८३।।
अभिजीत डोसे भाविक । चेपीत पाय सेवेत ।
जे काही लागेल । आणून देई वेळेवर ।।१८४।।
शिवा धोरण, जितु वानखडे । योगेश मुके, धनंजय ढगे ।
यापरि अनेक भक्त । भाऊंची सेवा करितसे ।।१८५।।
सुभाषराव कोल्हे खामगांवचे । देवमन डोसे जस्तगांवचे ।
काळजी वाहीत भाऊंची । भक्तिच्या कणवेने ।।१८६।।

राहुल मिटकरी सद्भक्तं । भाऊंच्या सेवेत तत्पर ।
कित्येक अनुभव घेवूनी । सद्गुरुचरणी अखंड सेवा असे ॥१८७॥
शांती आश्रमी धार्मीक कार्याला । सर्वांगरुपी सेवेला ।
मनापासुनी हातभाराला । भावभक्ती सेवा घडे ॥१८८॥
आश्रमी तिन मंदिर उभारीले । चवथे मंदिराचा खोदीला पाया ।
हे मंदीर सद्गुरु विनायकभाऊंचे । भक्तदेणगीतून होतसे ॥१८९॥
वैभव फोकमारे मंदिर कामावरी । होता मंदिराच्या कळसावरी ।
कोसळला अचानक तोल जाऊनी । पायाभरणीच्या खोल खड्ड्यात ॥१९०॥
हे पाहीले सर्वांनी । सर्वजण आले धावूनी ।
हात झटकून उभा राहोनी । वैभव वाचला सद्गुरुकृपे ॥१९१॥
क्षणभर लोकांना वाटले । भितीने श्वास रोखीले ।
पुढच्याच क्षणी सावरले । श्री संत विनायकभाऊंनी ॥१९२॥



Scanned with CamScanner

ऐसे भक्त अगणिक । दूर दूर वास्तव्यी ।
परि ह्दयी विसावती । सद्गुरुंची प्रतिमा ।।१९३।।
आत्मसात करावे प्रबोधन । संत विनायकभाऊंचे बोधवचन ।
जसे बाल शिशुचे स्पंदन । अविरत जप निरंतर ।।१९४।।
श्वास श्वासाची लय । जोवरी सहज सरल ।
साक्षीभावे चिरंतन । आत्मीक सद्भाव ठेवावा ।।१९५।।
सद्गुरु नामाचे चिंतन । प्रत्येक क्षणी मनन ।
कंठस्थ नाम स्वर । निनादावां अंतर्मुखी ।।१९६।।
ह्दयी सद्गुरु प्रतिमा । उजळावी आत्मीक प्रतिभा ।
भक्तिभावपूर्ण साधना । मनस्वी आनंदमय ।।१९७।।
भक्तिची सुखद वारी । करुनी मानव जन्मी ।
सांगती संत विनायक । श्रवण करावे मनोमनी ।।१९८।।



Scanned with CamScanner

सद्भक्त करती स्तोत्र पठण । नित्यनेमे करुनी श्रवण ।
लिला घडती भक्तांप्रती । हाची प्रगाढ विश्वास ॥१९९॥
श्री संतांची मंदियाळी । लासुरा शांती आश्रमी ।
येता दर्शन घेऊनी । परमानंद लाभतसे ॥२००॥
या स्तोत्राचे लेखन । घडवूनी आणीले भाऊंनी ।
सहज सरल लेखणीने । संत विनायकभाऊंनी साकारीले ॥२०१॥
सदाकदा नामचिंतन । श्वासापरि नामगुंजन ।
कर्तव्यनिष्ठेने संसार । समभावे सकल संपूर्ण ॥२०२॥
मानवी जीवनाचा सार । सद्गुरु नाम करि पार ।
संसार भवसागर । एक नामे उध्दारे ॥२०३॥
श्री समर्थ सद्गुरु । नाममंत्र घेवूनी ।
निरंतर श्वास वारी । घडेल मोक्ष जीवाला ॥२०४॥
लिला शब्दबध्द करण्याला । सामर्थ्य हे रेखाटण्याला ।



Scanned with CamScanner

मजपाशी नाही बळ । इतुकी ही व्याप्ती असे ॥२०५॥
लिलारुपी आकाश । मावेल का ओंजळीत ।
अल्पसे स्तुती सुमनं । स्तोत्र करावे पावन ॥२०६॥
सद्‌गुरु माऊली विनायक । लेकीबाईंचे माहेर ।
एकेची आमुचा पाठीराखा । हीच शाश्वती भक्तगणांची ॥२०७॥
भक्तांनी आश्रमी येवूनी । सद्‌गुरुंचे दर्शन घेवुनी ।
आपुल्या शिदोऱ्या सोडुनी । गोपाळकाला करावा ॥२०८॥
सद्‌गुरुंचे आशीर्वाद । असती आपुल्या परिजनांवर ।
हाच विश्वास ठेवूनी । सांष्टांग दंडवत करावे ॥२०९॥
स्तोत्र करावे पावन। श्री भाऊंचरणी वंदन ।
शब्दसुमनांचे चंदन । दरवळावे भक्तांमनी ॥२१०॥
श्रीकृष्णचे बोबडे बोल । घ्यावे गोडं करुनी ।
ओंजळ शब्दंरुपी सुमनांची । चरणी आपुल्या वाहतसे ॥२११॥
॥ सद्‌गुरु माऊली श्री संत विनायकभाऊ महाराज की जय ॥



Scanned with CamScanner

॥ हरि ॐ॥

॥ॐ नमो भगवते श्री विनायकाय नमः॥

# ॥ परमपुज्य संत श्री सद्गुरु विनायकभाऊ महाराजांची आरती ॥

आरती श्री विनायका । दीनानाथ सद्गुरुनाथा ।
कलियुगी हनुमंता । चरण दर्शन द्यावे आम्हा ॥१॥
आरती श्री विनायका...

उकळगावी प्रकटूनी । धारण केले मानव देहा
लिला जनां दाखवुनी । अनंत व्य[illegible] निवारुनी ॥२॥
आरती श्री विनायका...

नामचिंतन बळ । एकमुखी अविरत ।
सत्य संकल्पांचा दाता । चराचरी परमेश्वर ॥३॥
आरती श्री विनायका...

ब्रम्हनाम साक्षी । दृष्टी पदोपदी आम्हा ।
आईसम माया । लाविली आम्हा जिवा ॥४॥
आरती श्री विनायका...

जय श्रीराम नाम । जप करावा सदैव
एक नाम तारी । आम्हा श्री विनायका ॥५॥
आरती श्री विनायका...

Scanned with CamScanner